# University of Mumbai

गुण व प्रमाणपत्र विभाग,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई :- ४०० ०९८

क्र/गुण व प्रमाणपत्र /४८०/२०२५
दिनांक:- ०७ जानेवारी, २०२५

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/ प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित, संचलित व स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/ प्रमुख, विद्यापीठाच्या दुरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परीक्षेत्राचे समन्वयक/संचालक यांना, मंगळवार दि. ०७ जानेवारी, २०२५ रोजी संपन्न होत असलेल्या विद्यापीठाच्या वार्षिक दीक्षान्त समारंभाच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या परिनियमाप्रमाणे विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभ संपन्न झाल्याच्या दिनांकापासून पुढील ३० दिवसाच्या आत आपल्या महाविद्यालयात पदवी वितरण समारंभाचे आयोजन करण्यात यावे व त्याबाबतचा अहवाल समारंभ संपन्न झाल्याच्या पुढील १५ दिवसाच्या आत विद्यापीठाकडे सादर करण्यात यावा.

Yumraundale

(डॉ. पूजा रौंदळे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ - मुंबई
दिनांक - ०७ जानेवारी, २०२५

अ.क्र.

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/ प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित, संचलित व स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/ प्रमुख, विद्यापीठाच्या दुरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परीक्षेत्राचे समन्वयक/संचालक.

१ प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. संचालक, माहीती व संप्रेषण तंत्रज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ.
२. सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ.
३. सर्व सहायक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ..

२ प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१) मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग.
२) मा. कुलगुरु यांचे कार्यकारी सचिव.
३) मा. प्र. कुलगुरु यांचे स्विय सहायक.
४) मा. कुलसचिव व संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक

# मुंबई विद्यापीठ

## मुंबई विद्यापीठ

### वार्षिक दीक्षान्त समारंभ

सर्व संबंधिताच्या माहितीसाठी सूचित करण्यात येते की, पदव्या व पदविका प्रदान करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचा वार्षिक दीक्षान्त समारंभ-२०२५, हा विद्यापीठाच्या सर कावसजी जहांगीर सभागृह (दीक्षान्त सभागृह), फोर्ट परिसर, मुंबई- ४०० ०३२, येथे शनिवार, दिनांक १७ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता संपन्न होणार आहे. या दीक्षान्त सोहळयाचे थेट प्रक्षेपण मुंबई विद्यापीठाच्या संकेत स्थळावरून (www.mu.ac.in) प्रक्षेपित करण्यात येईल.

जे स्नातक २०२५ मधील प्रथम तसेच द्वितीय सत्रामध्ये त्यांच्या परीक्षेत दीक्षांत समारंभाच्या दिवसापूर्वी (दि. १७ जानेवारी, २०२६) उत्तीर्ण झालेले आहेत त्यांच्या पदव्या/पदविका प्रमाणपत्रे त्यांच्या संबंधित महाविद्यालयात पाठविण्यात येणार आहेत. तसेच त्या प्रमाणपत्रांचे वितरण हे संबंधित महाविद्यालयातून करण्यात येणार आहे.

उपलब्ध असलेल्या पदवी/पदविका प्रमाणपत्रांची यादी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर (www.mu.ac.in) प्रसिध्द करण्यात येईल. त्यातील आपले पदवी प्रमाणपत्र क्रमांक विद्यार्थ्यांनी शोधून महाविद्यालयात सादर करावे. जेणेकरून महाविद्यालयास प्रमाणपत्र शोधण्यास व वितरीत करण्यास सोयीचे होईल.

पदवी/पदविका प्रमाणपत्रे न मिळाल्यास अथवा सदर प्रमाणपत्रात काही त्रुटी आढळल्यास तद्संबंधीची लेखी तक्रार दीक्षान्त समारंभाच्या दिवसापासून एक महिन्याच्या आत परीक्षा विभागाच्या चौकशी कक्षात, छत्रपती शिवाजी महाराज भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई-४०० ०९८ येथे करावी.

**संबधित विद्यार्थ्यांचे पदवी/पदविका प्रमाणपत्रे संबंधीत महाविद्यालयांना पाठविण्यात येणार असल्याने, याबाबतची चौकशी किंवा प्रमाणपत्रे घेण्याकरीता दीक्षान्त समारंभाच्या दिवशी विद्यापीठात गर्दी करु नये, ही नम्र विनंती.**

आदेशावरुन,

( डॉ. पूजा रौंदळे )
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

दि. १५/१२/२०२५
मुंबई -४०० ०९८

Scanned with OKEN Scanner